वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.NO.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शुक्रवार दि.१० ऑक्टोंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# शहराच्या मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी मंजूर झालेली भुयारी गटार, अमृत जल योजनेच्या अर्धवटरावचे श्रेय युवराज घेणार का?





Email:-editordivyawarta@gmail.com

# दिव्य वार्ता

**मागील पाच वर्षाच्या सत्तेच्या काळात विरोधकांचा सुड घेण्यासाठी ही योजना एमजीपीला सोपविली अन् संपूर्ण शहराला वेठीस धरले**

## न.प.निवडणूकीचा सामना करण्यापुर्वी युवराज आपल्या पाच वर्षाच्या सत्ता काळातील बोगसगिरीचा हिशोब देणार का?

**या दोन्ही अपूर्ण योजनेचा लेखाजोखा पालकमंत्री अजितदादांसमोर मांडण्याची हिम्मत युवराजमध्ये आहे का?**



### या अपूर्ण योजनेमुळे बीड शहराचे नाव अर्धवटराव म्हणून ओळखले जाते

बीड, (दिव्य न्युज):- बीड शहरातील पाण्याचा निचारा करून रस्त्यावरील पाणी भुयारी पाईपलाईनने एकत्रित करून ते पाणी डायरेक्टर बिंदूसरा नदीमध्ये टाकण्याची योजना नगर पालिकेने तयार केली होती. बीड शहराला राज्य सरकारने अमृत जल योजने अंतर्गत करोडो रूपयांचा पाणी पुरवठा योजना मंजूर केली. त्या पाण्याचा निचारा करण्यासाठी त्यासोबतच ३००ते ४०० कोटी रूपयांची भुयारी गटार योजना ही मंजूर केली. मागील पाच वर्षापुर्वी नगर पालिकेत ज्यांची सत्ता होती, ज्यांना बीडकरांनी मोठा विश्वास व्यक्त करत बीडच्या नगर पालिकेत थेट नगराध्यक्ष करून पाठविले त्या सत्ताधाऱ्यांनी पाच वर्षात शहराचा बट्ट्याबोळ केला. राज्य शासनाने बीडकरांची ▶▶ पान २ वर

## सामाजिक सलोखा बिघडवणाऱ्या संग्राम जगताप च्या मोर्चास परवानगी देवू नये

**फारुक पटेल यांची बीड पोलिसांना पत्राद्वारे मागणी**

**बीड, (दिव्य न्युज):- महाराष्ट्राच्या सामाजिक वातावरणाला दूषित करण्याचा प्रयत्न सातत्याने होत आहे संग्राम जगताप यांच्या पूर्वीच्या काही वादग्रस्त वक्तव्याने दोन समाजात तेढ निर्माण होईल असे वातावरण निर्माण होते तर त्यांची काही वक्तव्य थेट अल्पसंख्याक समूहाच्या विरोधात असतात जेणे सामाजिक सलोखा बिघडतो आमदार संग्राम जगताप बीड शहरात येवून पुन्हा महाराष्ट्राच्या सामाजिक सलोख्याला तडा जाईल असे वक्तव्य करू शकतात यामुळे त्यांच्या कार्यक्रमाला बीड शहर पोलिसांनी परवानगी देवू नये अशा आशयाची मागणी बीड नगर पालिकेचे माजी गटनेते फारुख पटेल यांनी एका पत्रा द्वारे बीड शहर पोलिस आणि मुख्याधिकारी नगर परिषद बीड यांच्या कडे केली आहे.**



पुढे निवेदनात असे नमूद केले आहे की बीड शहरातील तमाम हिंदू मुस्लिम अठरा पगड जातीची लोक अत्यंत गुण्या गोविंदाने नांदतात वर्षानुवर्षे या शहराचा सामाजिक सालोखा अबाधित आहे कायम आहे हिंदू मुस्लिम बांधव नेहमी एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होतात नैसर्गिक आपत्ती असो की कोणतेही प्रसंग या ठिकाणचा सामाजिक सलोखा कायम आहे.

याचे प्रत्यय अनेकदा आलेले आहे मात्र या सलोख्याला कुठे तरी तडा जाईल या हेतूने काही राजकीय शक्ती काम करत असल्याचे दिसते दरम्यान च्या काळात आमदार संग्राम जगताप यांच्या वक्तव्याने मुस्लिम समाजाच्या भावना अनेकदा दुखावल्या आहेत त्याच प्रकारे संग्राम भंडारे ,यांच्या देखील वक्तव्याचे



पडसाद पूर्ण महाराष्ट्रात उमटले आहेत त्यांच्या बाबत तक्रारी देखील दाखल असून हीच मंडळी बीड शहरात हिंदू जन आक्रोश मोर्चा काढत असून यांनी यापूर्वी देखील अशाच मोर्चातून यांनी जहरी वक्तव्य करून महाराष्ट्राचे सामाजिक वातावरण दूषित केले ▶▶ पान २ वर

## धारूर शहराच्या सर्वांगिण विकासासाठी फसीयोद्दीन हेच योग्य चेहरा

**आ.प्रकाशदादा फसीभैय्याला एकनिष्ठेचे फळ देणार का?**





धारूर, (दिव्य न्युज):-आगामी धारूर नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. विविध पक्षांतून उमेदवारांच्या चर्चांना वेग आला असून, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडून शेख फसीयोद्दीन यांचे नाव नगराध्यक्ष पदासाठी जोरदार चर्चेत आहे.

शेख फसीयोद्दीन हे धारूर शहरातील परिचित सामाजिक कार्यकर्ते असून, गेल्या अनेक वर्षांपासून जनतेच्या प्रश्नांसाठी त्यांनी नेहमीच आघाडी घेतली आहे. नागरिकांच्या अडचणी, पाणीटंचाई, स्वच्छता, शिक्षण आणि तरुणांच्या रोजगाराच्या संधी यांसारख्या विषयांवर त्यांनी सातत्याने ▶▶ पान २ वर

**मिनी मंत्रालयाचा धुरळा पहिल्या टप्प्यात**

## आयोग जाहीर करणार निवडणूक?

मुंबई , (दिव्य न्युज):- राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची लगबग सुरू झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, ३१ जानेवारी २०२६ च्या आतमध्ये राज्यातील निवडणुका घेण्यासाठी आयोगाची तयारी अंतिम टप्प्यात आहे. पंचायत समिती आणि नगर परिषदेचे आरक्षण जाहीर करण्यात आले असून लवकरच मनपाचेही आरक्षण जाहीर करण्यात येणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तारखेबाबत महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. दिवाळीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे बिगुल वाजणार आहे. त्याबाबतच संभाव्य तारीख समोर आली आहे. त्याशिवाय शिक्षकांची इलेक्शन ड्युटी लावण्यात आली आहे, त्यानुसार निवडणुकीच्या तारखांचा अंदाज वर्तवला जातोय.

राज्यातील शिक्षकांची जानेवारीपर्यंत इलेक्शन ड्युटी लावल्याचे समोर आले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, दिवाळीनंतर २७ ते ३१ ऑक्टोबर यादरम्यान आयोगाकडून पहिल्या टप्प्यातील निवडणुकीची घोषणा करण्यात येणार आहे. नोव्हेंबर अखेर अथवा डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची निवडणूक होऊ शकते. तर दुसऱ्या टप्प्यात नगरपालिका आणि नगर परिषदाची निवडणूक होण्याची शक्यता आहे.

## राज्य मुस्लिम खाटीक समाजसेवा संस्थेचे हाजी आरफात शेख व जावेद कुरेशी यांची कौतुकास्पद कामगिरी

**जिल्हा रुग्णालयातील बेवारस महिलांना दिला माणुसकीचा आधार**



बीड, (दिव्य न्युज):- राज्य मुस्लिम खाटीक समाजसेवा संस्थेचे अध्यक्षहाजी आरफात शेख यांच्या मार्गदर्शनाखाली व जावेद कुरेशी यांच्या वतीने बेवारस आणि असहाय महिलांना आधार देण्याचे समाजोपयोगी कार्य गुरुवारी बीड जिल्हा रुग्णालयात करण्यात आले.

संस्थेचे उपाध्यक्ष जावेद कुरेशी यांनी स्वतः पुढाकार घेत, रुग्णालयात बेवारस अवस्थेत असलेल्या महिलांना आंघोळ घालून स्वच्छ कपडे परिधान ▶▶ पान २ वर

**वारीस पठाण यांची थेट स्ट्रेचरवर जाशील अशी धमकी**

## जागा, वेळ, किंवा मस्जिद निवडा-आ.नितेश राणे



मुंबई, (दिव्य न्युज):- एमआयएमचे खासदार बॅरिस्टर असदुद्दीन ओवैसी यांची काल (गुरूवारी, ता ९) अहमदनगरमधील मुकुंदनगरच्या सी.आय.व्ही ग्राउंडवर ओवैसींची जाहीर सभा झाली. या सभेत एमआयएमचे नेते वारीस पठाण यांनी भाजप नेते आणि मंत्री नितेश राणे यांच्यावर हल्लाबोल केला. येशील दोन पायावर आणि जाशील स्ट्रेचरवर असे म्हणत वारीस पठाण यांनी मंत्री नितेश राणेंना एक प्रकारे धमकी दिली. त्यावर आज मंत्री नितेश राणेंनी उत्तर दिलं आहे.कालची ▶▶ पान २ वर

# पंकजा मुंडेंच्या वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याची विक्री ?



बीड (दिव्य न्युज):- जिल्ह्यातील परळी तालुक्यातील पांगरी येथील वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना विक्रीच्या चर्चांमुळे सध्या सहकार क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. दिवंगत लोकनेते गोपीनाथ मुंडे यांनी स्थापन केलेल्या या प्रतिष्ठित सहकारी साखर कारखान्याची विक्री झाली असल्याचा गंभीर आरोप कायदाविषयक सल्लागार परमेश्वर गीते यांनी केला आहे. परमेश्वर गीते हे काही काळ या कारखान्याशी कायदेशीर सल्लागार म्हणून कार्यरत होते. त्यांनी सदर विक्री थांबवावी, अशी मागणी करत बीडचे जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज देखील सादर केला आहे.

भाजप नेत्या आणि मंत्री पंकजा मुंडे या वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्ष राहिलेल्या आहेत. हा कारखाना मंत्री पंकजा मुंडे यांनी शेतकऱ्यांच्या सोयीसाठी भाडेतत्त्वावर चालवण्यासाठी दिला होता. मात्र, संपूर्ण कारखाना विक्रीसाठी काढण्यात आल्याचा आरोप आता पुढे आल्याने सहकार क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, यापूर्वी पंकजा मुंडे यांच्या ताब्यातील पनगेश्वर साखर कारखान्याची विक्री झाली होती. त्यामुळे गोपीनाथ मुंडे यांनी उभा केलेल्या वैद्यनाथ साखर कारखान्याच्याही भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.

परळी आणि पांगरी परिसरातील शेतकऱ्यांना ऊस गाळपासाठी जवळचा पर्याय उपलब्ध व्हावा, यासाठी गोपीनाथ मुंडे यांनी हा कारखाना उभारला होता. त्यामुळे या कारखान्याची विक्री झाल्याच्या चर्चांनी मोठं वादळ निर्माण झालं आहे. वैद्यनाथ साखर कारखान्याची खरेदीखत रोखण्याच्या मागणीसाठी परमेश्वर गीते यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज देखील केले आहे. आता या प्रकरणात नेमकी काय माहिती समोर येणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

याबाबत कायदा विषयक सल्लागार परमेश्वर गीते म्हणाले की, वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना हा गोपीनाथ मुंडे यांच्या संकल्पनेतून स्थापन करण्यात आला होता. त्यांच्या पश्चात शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी कामगारांच्या हिताचे निर्णय घेणे आवश्यक होते. मात्र, त्यांच्या हिताच्या विरुद्ध निर्णय घेतल्याने हा कारखाना कर्जबाजारी झाला. युनियन बँक ऑफ इंडिया मार्फत तो कारखाना ओमकार साखर कारखाना प्रायव्हेट लिमिटेडला विक्री करण्यात आला आहे. १४ ऑगस्ट २०२५ रोजी खरेदीखत नोंदवण्यात आलेले आहे . खरेदीखत ऑफलाइन नोंदवल्यामुळे त्या कारखान्याचे योग्य मूल्यांकन करण्यात आलेले नाही. १३१ कोटी ९८ लाख रुपयांच्या कवडीमोल रकमेत कारखाना विक्री करण्यात आलेला आहे. हा कारखाना विक्री करण्याचा निर्णय शेतकऱ्यांच्या हिताच्या विरोधातील आहे. शेतकरी आणि सभासदांचे भांडवल बुडाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे राज्य शासनाने हस्तक्षेप करून खरेदी खत व्यवहार रद्द करावा. शासनाकडून कारखान्याला मदत मिळावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## बीड नगर पालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने बैठकीचे आयोजन

बीड , (दिव्य न्युज):- आगामी बीड नगर परिषद निवडणूक २०२५ पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) तर्फे बीड शहरातील कार्यकर्ता आणि पदाधिकाऱ्यांची महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे.

बीड नगर पालिकेच्या नगराध्यक्ष आणि नगरसेवक आरक्षण सोडतीनंतर आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रमुख उपस्थितीत पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक दि.११ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी



१०.०० वाजता राष्ट्रवादी काँग्रेस भवन,बार्शी रोड,बीड येथे होणार असून या बैठकीस आमदार संदीप क्षीरसागर, माजी

### उपस्थित राहण्याचे आ.संदीप क्षीरसागरांनी केले आवाहन

आमदार सय्यद सलीम, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के आणि अन्य वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. या बैठकीत नगर परिषद निवडणुकी संदर्भातील संघटनात्मक तयारी, उमेदवार निवड प्रक्रिया, प्रचार आराखडा आणि पक्ष बळकटीकरण यावर सविस्तर चर्चा होणार आहे. बीडशहरातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि इच्छुक उमेदवारांना वेळेत उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) तर्फे आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

पान ४ वरून

## जिंतूर तहसील

महाराष्ट्र सरकारने सुद्धा द्यावी. तसेच जिंतूर तालुका संपूर्ण दुष्काळ ग्रस्त जाहीर करावा. जिंतूर तालुक्यातील वनजमीन धारकांच्या दाव्याचा संयुक्त पंचनामा करून व वनजमीन कसणाऱ्याच्या नावे करावी, शेतमजूरांना श्रम नुकसान भरपाई म्हणून ३०,००० रुपये देण्यात यावे इत्यादी मागण्यासाठी एक दिवसीय धरणे आंदोलन करून तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले निवेदन नायब तहसीलदार श्री प्रशात राखे यांनी निवेदन स्विकारले या वेळी क्रॉमेड अंकूश बुधवत, क्रॉमेड उद्धव पौळ, कॉ राजेश दक्ष, कॉ सदाशिव देवकर, कॉ बाबाराव बुधंवत, पाडूरंग कोरडे, लक्षण ठोंबरे व अनेक महिला या वेळी उपस्थित होते .

## बीड नगर परिषद

आपली रणनीती आखत आहेत. त्यांच्या उमेदवारीमुळे वॉर्ड ११ ची निवडणूक आता लक्षवेधी ठरणार आहे. नगर परिषदेच्या राजकारणात नवचैतन्य आणण्याची क्षमता सोहेल शेख यांच्यात असल्याने, वॉर्ड ११ मधील मतदार त्यांना संधी देतात का, याकडे आता संपूर्ण बीड शहराचे लक्ष लागले आहे. त्यांच्या उमेदवारीची अधिकृत घोषणा लवकरच होण्याची शक्यता आहे.

## ग्राउंड लेव्हलवर

समाजसेवेचे काम करतात. आणि, त्यांच्या कट्टर समर्थक असल्यामुळे तसेच ग्राउंड लेव्हलवर काम करणारी महिला तसेच संपूर्ण शहराला परिचित असलेला अनुसूचित जाती प्रवर्गातील दुसरा महिला चेहरा डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या गटात नाही. म्हणून बीड नगरपरिषद नगराध्यक्ष पदाची उमेदवारी संगीताताई वाघमारे यांनाच मिळू शकते अशी संपूर्ण बीड शहरात चर्चा आहे.

सामाजिक व राजकीय काम गेल्या वीस वर्षापासून समाजकार्यात आणि राजकीय जीवनात कार्यरत. रमाई आवास योजना मार्फत गरजू लोकांना घरकुल मंजूर करून दिले. शासनामार्फत राबविलेल्या घरोघरी शौचालय या योजनेमार्फत असंख्य गरीब नागरिकांना पाठपुरावा करून शौचालय मंजूर करून दिले. उज्वला गॅस योजनेमार्फत नागरिकांना गॅस कनेक्शन उपलब्ध करून दिले. नगरपालिकेकडे पाठपुरावा करून प्रभागातील रस्ते नाल्या मंजूर करून तयार करून घेतले. वेळोवेळी परिसरातील पथदिवे बदलून घेतले जातात जेणेकरून नागरिकांची गैरसोय होणार नाही. वेळोवेळी परिसरातील नाल्या स्वच्छ करून घेतल्या जातात जेणेकरून नागरिकांचे आरोग्य चांगले राहील. परिसरातील कुजलेले विद्युत पोल तसेच काही लोकांच्या घरामध्ये असलेले विद्युत पोल कसलीही हानी न होता पाठपुरावा करून काढून टाकले. ज्या ठिकाणी नवीन विद्युत पोलची आवश्यकता असेल अशा ठिकाणी विद्युत पोल बसवले आहेत. परिसरातील विधवा महिला, घटस्फोटीत महिला यांच्यासह जे खरंच दारिद्र्यरेषेखाली येतात अशा नागरिकांना बीपीएल राशन कार्ड पाठपुरावा करून उपलब्ध करून दिले. तसेच राशन दुकानांमध्ये पाठपुरावा करून नागरिकांना राशन उपलब्ध करून दिले. निराधार, श्रावण बाळ यासाठी पात्र असलेल्या नागरिकांचे शासनाकडे पाठपुरावा करून पगारी सुरू करण्यात आल्या. सरकारी दवाखान्यांमध्ये नागरिकांना काही मदत लागल्यास उदा. रक्ताची गरज भासल्यास तसेच प्रसूती संदर्भात काही अडचणी असल्यास अथवा अपघात अशा प्रसंगी वेळोवेळी उपस्थित राहून नागरिकांची मदत केली जाते. समाज कल्याण, नगरपालिका मार्फत राबवण्यात येणाऱ्या योजना नागरिकांपर्यंत पोहोचवून त्यांना त्यांचा लाभ मिळवून दिला जातो. तहसील, समाज कल्याण, पोलीस स्टेशन, एसपी ऑफिस, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, पंचायत समिती, यासह सर्व सरकारी कार्यालयामध्ये नागरिकांना काही अडचण असेल तर तेथे जाऊन नागरिकांची मदत केली जाते. बालविवाह हुंडाबंदी यासारख्या प्रथांविरुद्ध नागरिकांमध्ये जनजागृती केली जाते. शासनाने राबवलेल्या कामगार योजनेमार्फत नागरिकांना लाभ मिळून दिला जातो. रक्तदान शिबिर आयोजित करणे. अवयवदान करण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करणे. मी स्वतः अंगणवाडी शिक्षिका असल्यामुळे अंगणवाडी मार्फत येणाऱ्या सरकारी योजना राबविले जातात. मतदान नाव नोंदणी शिबिर आयोजित करणे. वीस वर्षापासून आंबेडकरी चळवळीत सक्रिय. महामानवांच्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम आयोजित करणे. नागरिकांची काही अडचण असेल तर एका फोनवर उपस्थित राहून समस्यांचा निराकरण करणे.

## जिंतूर तहसील

महाराष्ट्र सरकारने सुद्धा द्यावी. तसेच जिंतूर तालुका संपूर्ण दुष्काळ ग्रस्त जाहीर करावा. जिंतूर तालुक्यातील वनजमीन धारकांच्या दाव्याचा संयुक्त पंचनामा करून व वनजमीन कसणाऱ्याच्या नावे करावी, शेतमजूरांना श्रम नुकसान भरपाई म्हणून ३०,००० रुपये देण्यात यावे इत्यादी मागण्यासाठी एक दिवसीय धरणे आंदोलन करून तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले निवेदन नायब तहसीलदार श्री प्रशात राखे यांनी निवेदन स्विकारले या वेळी क्रॉमेड अंकूश बुधवत, क्रॉमेड उद्धव पौळ, कॉ राजेश दक्ष, कॉ सदाशिव देवकर, कॉ बाबाराव बुधंवत, पाडूरंग कोरडे, लक्षण ठोंबरे व अनेक महिला या वेळी उपस्थित होते .

## समस्यांवर भावी

शहरातून नागरिकांचे माध्यमांना – रोज फोन येतात की 'वीजेचे नेत्यांना –घेणेदेणे नाही तुम्ही तरी लक्ष घाला'. महावितरणचे कोणते अधिकारी – मुख्यालयात असतात हेही भावी नेत्यांना – माहिती नाही.वीज वितरणचा व्हाट्सअप ग्रुप बनवला आहे त्यावरही समाजसेवक दत्ताजी जगताप सोडले तर कोणच बोलत नाही, नगरसेवक होउन कारभार पाहताना हे प्रश्न भावीना दिसत नाहीत का असा प्रश्न पडतो. शहरात अनेक भागात आजही झाडूवाल्या मावशी जात नाहीत, टेंडर मात्र न चुकता निघते, शहरात मंत्री येणार असतील तर घरापासून ते दारापर्यंत सर्व खड्डे बुजवले जातात, रस्त्यावर झाडू मारला जातो, परंतु इतर वेळी शहरात अनेक भागात कचरा साचून मंच्छर-डास यामुळे मुले वृद्ध आजारी पडतात. याबाबत अधिकारी सर्वसामान्यांना दात देत नाहीत अशावेळी या भावी म्हणणाऱ्यांनी मागील पाच वर्षाच्या काळात सर्वसामान्यांची किती प्रश्न सोडवले हे एकदा स्वतःला विचारावे असे मत शहरातील काही ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केले आहे.

ठराविक नेत्यांचा अभ्यास असल्याने प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी त्यांची कामे वेळेत करतात. त्यातही जवळच्यांचे कामे नेतेही सांगत असल्याने प्रशासन सगळ्यांनाच खिशात घालून आहे. आमदार विक्रमसिंह पाचपुते यांचा नक्कीच अभ्यास आहे, त्यांनी गेल्या सहा महिन्यापासून जो कामाचा सपाटा सुरू ठेवला आहे त्यामुळे सर्वसामान्य लोक त्यांच्यावर खुश आहेत. दुसऱ्या नेत्यांनी अभ्यासपुर्ण मंत्री, अधिकारी यांच्याकडे समस्या मांडून त्याची सोडवणूक करुन घेणे आवश्यक आहे, तसे होत नसल्याचे दिसते. शिवसेना शिंदे गट जिल्हाध्यक्षा मिराताई शिंदे वगळता इतर भावी नगरअध्यक्ष, नगरसेवक आक्रमक दिसत नाहीत हेही वास्तव आहे.

## आरएसएस ने मुस्लिमांचं

आपल्या लेखात म्हटले. दलित समुदायातून आलेले सरन्यायाधीश गवई यांच्या विधानामुळे सनातन धर्माचा अपमान झाल्याचा सदरील वकिलाने आरोप केला. या घटनेमुळे जातीय भेदभावाचे कुरूप पुन्हा एकदा समोर येत असल्याचे या अग्रलेखात नमूद करण्यात आले आहे.उर्दू टाइम्सने केले सरन्यायाधीश गवई यांचे कौतुक महात्मा गांधींनी जातीय भेदभावाविरोधात लढा दिला; तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाची निर्मिती करून तो संपवण्याचा प्रयत्न केला, तरीदेखील आज हा धोका कायम असून अलीकडच्या काळात त्याला अधिकच खतपाणी घातले जात आहे, अशी चिंताही उर्दू टाइम्सच्या अग्रलेखातून व्यक्त करण्यात आली. सरन्यायाधीश भूषण गवई यांनी या घटनेला अत्यंत संयमाने हाताळले होते. या निंदनीय घटनेकडे दुर्लक्ष करून त्यांनी न्यायालयातील प्रकरणाची सुनावणी सुरूच ठेवली होती. इतकेच नाही तर, हल्लेखोर वकिलावर कोणतीही कारवाई नका आणि त्यांना सोडून द्या, असे निर्देशही त्यांनी न्यायालयाच्या नोंदणी विभागाला दिले होते, सरन्यायाधीशांच्या या भूमिकेचे अग्रलेखात कौतुक करण्यात आले आहे.

पान १ वरून

## शहराच्या मुलभूत

पिण्याच्या पाण्याची तहान भागविण्यासाठी अनेक कोटी रूपयांची अमृत जल पाणी पुरवठा योजना मंजूर केली. त्या सोबतच बीड शहरातील पाण्याचा निचारा करण्यासाठी भुयारी गटार योजना ही मंजुर केली. ही दोन्ही कामे या सत्ता धाऱ्यांनी आपल्या सत्तेच्या मस्तीत फक्त आणि फक्त पालिकेतील विरोधी पक्षातील नगरसेवकांची जिरवण्यासाठी ही योजना स्वतःच्या मर्जीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग केली तसे दोन ठराव नगर पालिकेने मंजूर करून घेतले. एका ठरावावर सुचक म्हणून भिमराव वाघचौरे आणि अनुमोदक म्हणुन विनोद मुळूक यांच्यासह नगराध्यक्ष म्हणून नगराध्यक्षांची स्वाक्षरी आहे. ठराव क्रं. ७/२०१८/२०१९ दि. ११/०६/२०१८ असे आहे तर दुसऱ्या ठरावावर सुचक म्हणुन विनोद मुळूक आणि अनुमोदक म्हणून भिमराव वाघचौरे यांची स्वाक्षरी असून या ठरावाला ठराव क्रमांकच नसून सर्व साधारण विशेष सभा दि.३०/१०/२०१७ रोजी घेतल्याचे दाखविण्यात आले. या ठरावामध्ये आज दि.३०/१०/२०१७ रोजी बीड नगर परिषद, बीडच्या सर्व साधारण सभेमध्ये कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग बीड यांचे पत्र क्रं. १२९५ दि.२७/१०/२०१७ च्या पत्रावर चर्चा झाली. सदर पत्राचे आशय श्री.दंडे (उपअभियंता पाणी पुरवठा विभाग न.प.बीड) यांनी सभागृहास वाचवून दाखविला. त्याप्रमाणे सर्वानुमते खालील प्रमाणे ठराव प्रारित करण्यात आला आहे. बीड शहर भुयारी गटार योजना करीता सदर योजनेच्या किंमतीच्या २५ % लोक सहभाग बीड नगर परिषद भरण्यास तयार आहे. बीड शहर भुयारी गटार योजनेसाठी मलनि सारण जलशुध्दीकरण केंद्र पंपींग स्टेशन व इतर कामांसाठी आवश्यक असणारी जागा बीड नगर परिषद बीड उपलब्ध करून देण्यास तयार आहे. बीड शहर भुयारी गटार योजनेचे काम पुर्ण ठेव तत्वावर प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याकडे वर्ग करण्यास मंजूरी प्रधान करण्यात येत आहे. अशा प्रमाणे हे ठराव घेवून या सत्ताधाऱ्याने ही चांगली योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माथी मारून शहराचे वाटोळे केले आहे. ही भुयारी गटार योजना आता संपुष्टात आली असून ठेकेदारांनी आणि ठेकेदारांकडून टक्केवारी घेणाऱ्यांनी १९ कोटी रूपये घेवून इथून पळ काढला आहे. हे काम इंद्रायणी कन्स्ट्रक्शन, केआयपीएल औरंगाबाद यांना देण्यात आले होते. ठेकेदारानी काम पूर्ण न करताच १९ कोटी रूपयांवर डल्ला मारून हे काम अर्धवटराव करून सोडून गेला आहे. म्हणून बीड करांची मागणी आहे की, या अर्धवटराव कामांचे श्रेय बीडचा युवराज घेणार आहे का? त्या सोबत सत्तेच्या काळात झालेल्या बोगस आणि गैर कामांचा हिशोब ही युवराज निवडणूकीपुर्वी देणार आहे का? अशी मागणी बीड शहरातील नागरीकांच्या वतीने युवराज ला करण्यात येत आहे.

## धारूर शहराच्या सर्वांगिण

भूमिका घेतली आहे. त्यामुळे त्यांची ओळख जनतेचा माणूस अशी निर्माण झाली आहे.फसीयोद्दीन यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की,जर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून मला संधी मिळाली, तर मी नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढवणार आहे. धारूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार प्रकाश सोळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली मी काम करणार आहे.या विधानानंतर धारूरच्या राजकीय वर्तुळात चर्चांना वेग आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट सध्या धारूर शहरात संघटन बळकट करण्यासाठी प्रयत्नशील आहे. आमदार प्रकाश सोळुंके यांच्या नेतृत्वाखाली पक्ष मजबूत करण्याच्या दिशेने हालचाली सुरू आहेत.ङ्गदरम्यान, शेख फसीयोद्दीन यांच्या उमेदवारीवर पक्षातील अनेक कार्यकर्ते समाधानी दिसत आहेत. शहरात त्यांचं नाव घेताच सकारात्मक चर्चा होत असून, अनेक कार्यकर्त्यांनी फसीयोद्दीन हेच योग्य चेहरा अशी भूमिका घेतली आहे.ङ्गआता सर्वांचे लक्ष राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या निर्णयाकडे लागले आहे की, नगराध्यक्षपदाची उमेदवारी अखेर शेख फसीयोद्दीन यांनाच मिळते का?

## सामाजिक सलोखा

आहे आता तेच बीड शहरात येत्या १४-०-२०२५ रोजी मोर्चा आयोजित करत आहेत या ठिकाणी सामाजिक सलोखा बिघेडल ,दोन समाजात तणाव निर्माण होईल,दोन समाजात तेढ निर्माण होईल अशी वक्तव्य होण्याची शक्यता आहे. बीड शहरात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल म्हणून बीड शहर पोलिसानी यांनी या कार्यक्रमाला परवानगी देवू नये अशी मागणी या निवेदनाद्वारे आपल्या कडे करण्यात येते जरी आपण परवानगी दिली आणि सामाजिक वातावरण बिघडून परिस्तिथी नियंत्रणा बाहेर गेली तर याची सर्वस्वी जबाबदारी ही आपली व प्रशासनाची असेल याची नोंद घ्यावी असे पत्राद्वारे फारुख पटेल यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे

## राज्य मुस्लिम खाटीक

करून दिले. झोपण्यासाठी चटई व उबेसाठी ब्लॅकेटचे वाटप करण्यात आले. तसेच महिलांसाठी जेवणाची व्यवस्था करून त्यांना मानवी सन्मानाने वागविण्याचे कार्य त्यांनी केले.विशेष म्हणजे, एका महिलेच्या डोक्यावर जखम असल्याचे दिसल्याने कुरेशी यांनी स्वतः तिची मलमपट्टी करून वैद्यकीय मदत दिली. या सेवाभावी उपक्रमादरम्यान त्या महिलांना अश्रू अनावर झाले.या कार्यात राज्य मुस्लिम खाटीक समाजसेवा संस्था आणि अध्यक्ष हाजी आरफात शेख साहेब व जावेद भैय्या कुरेशी यांच्या या मानवी संवेदनेच्या कार्याचे करावे तेवढे कौतुक कमी आहे.

## जागा, वेळ, किंवा

सभा अहिल्यानगरमध्ये झाली अहमदनगरमध्ये नाही. भौकनेवाले कुत्ते काटते नही. अहमदनगरमध्ये येत वळवळ करत होती. कायदा सुव्यवस्था मानतो असं बोलतात, मात्र अहिल्यानगर नाव मानायचं नाही, औरंगाबादचे नाव संभाजीनगर केलंय ते मानायचे नाही. हे काय पाकिस्तान आहे का? शरीया आहे का? ज्यांच्या विचारातून पिलावळ तयार झाली, ते भारताच्या स्वातंत्र्याच्या विरोधातच होते. सरकार म्हणून बघावं लागेल मग तुमच्या सभा लावायच्या की नाही. हिरव्या सापांची वळवळ झाली, हिंदुत्ववादी सरकार आहे. वातावरण खराब करण्याचा प्रयत्न असेल तर सरकारला देखील विचार करावा लागेल, सभा होऊ द्यायच्या की नाही, असं म्हणत नितेश राणेंनी (छळींशीह ठरपश) उत्तर दिलं आहे.


पैगंबर कुराणावर बोललं तर वळवळतं. आमच्या देवींचे हात तोडता तेव्हा आम्ही बोलायचं नाही का? सगळीकडे आय लव्ह मोहम्मदचे पोस्टर लावाल आणि धमकावत असाल तर आम्हाला आमचा तिसरा डोळा उघडायला लावू नका. खरा सनातनी हिंदू आंबेडकर यांना मानणारा आहे. शिवशक्ती भीमशक्ती मानणारा आहे. यांना शरीया आणायचा आहे, आंबेडकर यांना मानत नाहीत. हिंदुत्ववादी कार्यकर्ते म्हणून पैजाम्याचे नाडे कसे ढिले करायचे हे आम्हाला माहिती आहे. रझाकारांच्या इतिहासावर यांनी बोलावलं. आमचं तोंड उघडायला लावू नका, असं नितेश राणे म्हणालेत.

तर वारीस पठाण यांच्या आव्हानावर नितेश राणे म्हणाले, जागा आणि वेळ कळवा, किंवा मस्जिद निवडा, धमक्या देऊ नका, तुम्हाला माहिती आहे नितेश राणे काय चीज आहे. हे नसबंदीवाले पिलावळ असेल, हे लोकं नुसते भुंकतात. राज्यातील वातावरण खराब करायचं नाही. आमचं सरकार सभेची परवानगी देतं आहे, म्हणून बोलू शकता, नाहीतर मस्जिदीच्या भोंग्यातून बोलावं लागलं असतं. मूर्तीची विटंबना केली तेव्हा एमआयएमनं निषेद्ध का नोंदवला नाही? वेगळा शरीया कायदा आणायचा आहे, आणि आम्हाला धमक्या देता, आता यांना हैदराबादमार्गे पाकिस्तानात पाठवण्याचे काम करावे लागेल. आम्ही सगळ्या मुस्लीमांविरोधात नाही. हिंदु सणात दगडं मारणं, गजवा हिंद ज्यांना करायचं आहे, त्यांच्या विरोधात आम्ही आहोत, असंही नितेश राणे म्हणालेत.आय लव्ह मोहम्मदवरती बोलताना नितेश राणे म्हणाले, मूळात सगळे हिंदू आहेत, दाढी आणि टोप्या घातल्या. औरंग्याने आणि टिप्याने धर्म बदलायला लावले. आय लव्ह मोहम्मद जर बोलत असाल तर हर हर महादेव देखील बोला. हिंदू धर्माची विशालता मोठी आहे.

भाजपचे काही लोक द्वेष पसरवत असल्याचे वारीस पठाण म्हणाले. यावेळी बोलताना मंत्री वारीस पठाण यांनी नेपाळी म्हणत नितेश राणे यांच्यावर जोरदार टीका केली. मस्जिदमध्ये घुसून मुस्लिमांना मारणार असे नितेश राणे म्हणतात. पण येशील दोन पायावर आणि जाशील स्ट्रेचरवर असे म्हणत वारीस पठाण यांनी राणेंवर टीका केली. लवकरच महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहे. ३१ जानेवारीपर्यंत सगळ्या निवडणुकांची प्रक्रिया पूर्ण करावी असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. या निवडणुकांसाठी एमआयएम कायम तयार असल्याचे वारीस पठाण म्हणाले.

# पोलिसांना ‘सर्वोच्च’ झटका

## पोलिसांचा व्हिडीओ काढणाऱ्याविरोधात दाखल गुन्हा रद्द



पुणे । दिव्य न्युज

अनधिकृत पार्किंगवर कारवाई करताना 'महापालिका दंडा'च्या नावाखाली एक हजार रुपयांची रोख मागणी करणाऱ्या महिला पोलिस कर्मचाऱ्याचे चित्रीकरण करून समाजमाध्यमात 'व्हायरल' केल्याप्रकरणी एका नागरिकावर पुणे पोलिसांनी दाखल केलेला फौजदारी गुन्हा सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल केला आहे. 'ही फौजदारी कारवाई पुढे चालविण्याची परवानगी देणे म्हणजे कायद्याच्या प्रक्रियेचा दुरुपयोग आहे,' तसेच 'या व्हिडिओवर इतरांनी केलेल्या अपमानास्पद टिप्पणीसाठी पोस्टकर्त्याला जबाबदार धरता येणार नाही,' असा महत्त्वपूर्ण निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती निर्मला रेगी आणि न्यायमूर्ती रेणू बाला गंभीर यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला. त्यामुळे अखिल भारतीय ग्राहक पंचायत पुणेचे अध्यक्ष व संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचे (डीआरडीओ) निवृत्त कर्मचारी विजय सागर यांच्याविरोधात भारतीय दंड संहितेच्या कलम ५०९ (विनयभंग करण्याच्या उद्देशाने केलेली कृती), ५०० (अब्रुनुकसानी) व ३४ आणि माहिती व तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६७नुसार शिवाजीनगर पोलिस ठाण्यात दाखल केलेला गुन्हा रद्द झाला आहे.

### काय आहे प्रकरण ?

याचिकाकर्ते विजय सागर २७ नोव्हेंबर २०२२ रोजी जंगली महाराज रस्त्यावर पदपथाच्या बाजूला दुचाकी लावली होती. अनधिकृत पार्किंग केलेली ही दुचाकी महिला वाहतूक पोलिस कर्मचाऱ्यांनी उचलून शिवाजीनगर वाहतूक पोलिस चौकीत नेली. त्यामुळे विजय सागर आपली मुलगी व एका वर्षाच्या नातवासह चौकीत गेले. तिथे त्यांना ७८५ रुपयांचे चलन भरण्यास सांगितले, तसेच 'महापालिका दंड' (कॉर्पोरेशन फाइन) म्हणून एक हजार रुपये रोख स्वरुपात मागितले. विजय सागर यांनी ही रक्कम लाच असल्याचा दावा करत समाजमाध्यमात 'लाइव्ह व्हिडिओ' सुरू केला. हा 'व्हिडिओ' मोठ्या प्रमाणात 'व्हायरल' होऊन त्यावर अनेकांनी महिला पोलिस कर्मचारीविरोधात अवमानकारक टिप्पणी केली. ही बाब कळल्यावर विजय सागर यांनी हा व्हिडिओ समाजमाध्यमातून काढून टाकला. त्यानंतर दोन दिवसांनी संबंधित महिला पोलिस कर्मचाऱ्याने विजय सागर व अज्ञात व्यक्तींविरोधात शिवाजीनगर पोलिस ठाण्यात तक्रार केल्यावर गुन्हा दाखल झाला होता.



### सर्वोच्च न्यायालयाने निकालात काय म्हटले?

'एफआयआर 'मध्ये स्पष्ट दिसते की याचिकाकर्त्याविरोधात कोणताही गुन्हा दाखल होऊ शकत नाही.

या घटनेनंतर तक्रारदार महिला पोलिस कर्मचारीविरोधात इतरांनी अपमानास्पद भाषेचा वापर केला, परंतु प्रथमदर्शनी हा आरोप याचिकाकर्त्याला देता येणार नाही. याचिकाकर्त्याविरोधात ही फौजदारी कारवाई सुरू ठेवणे कायद्याच्या प्रक्रियेचा गैरवापर असून, उच्च न्यायालयाने आपल्या अधिकारांचा वापर करून ही फौजदारी कारवाई रद्द करायला हवी होती. इतर कोणी आक्षेपार्ह किंवा अपशब्द वापरले असतील, तर तक्रारदारास कायदेशीर तक्रार दाखल करण्याचे स्वातंत्र्य आहे.

### 'पोस्टकर्ता जबाबदार नाही'

'कलम १९ (१) (अ) अंतर्गत अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मूलभूत अधिकारामध्ये समाजमाध्यमातील पोस्टही समाविष्ट आहे. त्यावर अनोळखी व्यक्तींनी असभ्य, अश्लील व बदनामीकारक टीका केल्या असतील, तर त्यांच्यावर कारवाई करावी, मूळ पोस्टकर्त्याला फौजदारी कायद्यानुसार जबाबदार धरता येणार नाही. पोलिसांनी आकसातून कारवाई केली असून, त्यांना वाहतूक दंडाव्यतिरिक्त महापालिका दंडाच्या नावाखाली वसुलीचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही. त्यामुळे संबंधित महिला पोलिस कर्मचाऱ्याने एक हजार रुपये रोख मागण्याचे कृत्य बेकायदा आहे,' असा युक्तिवाद सर्वोच्च न्यायालयात केल्याचे ॲड. सत्या मुळे यांनी सांगितले.

### उच्च न्यायालयाने फेटाळली याचिका

विजय सागर यांनी ॲड. सत्या मुळे यांच्यामार्फत पुणे सत्र न्यायालयात अटकपूर्व जामीनासाठी अर्ज केला. न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केल्यावर सागर यांनी आपल्याविरोधातील गुन्हा रद्द करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. परंतु, या प्रकरणी आरोपपत्र दाखल झाल्याचे कारण देत उच्च न्यायालयाने सागर यांची याचिका फेटाळली. त्यामुळे सागर यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

# पटसंख्येचे कारण पुढे करून शाळा बंद करणे शिक्षण हक्क कायद्याचे उल्लंघन,शिक्षक समितीचा आक्षेप

अमरावती । दिव्य न्युज

राज्यात ५ पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा तात्काळ बंद करण्याचे आयुक्त (शिक्षण) यांचे निर्देश जारी झाल्याने शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. हा निर्णय शिक्षण हक्क कायद्यातील (आरटीई) तरतुदींशी विसंगत असून, दुर्गम भागातील गोरगरीब व वंचित मुलांच्या शिक्षणावर मोठा परिणाम करणारा असल्याचे मत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने व्यक्त केले आहे. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या धोरणाला छेद देणारा हा निर्णय तातडीने मागे घ्यावा, अशी मागणी शिक्षक समितीने शालेय शिक्षणमंत्री तसेच शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केली आहे.

**दुर्गम भागातील शिक्षण धोक्यात**

आयुक्त (शिक्षण) यांच्या निर्देशानुसार, ५ किंवा त्यापेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा त्वरित बंद करण्याचे पत्र शिक्षण विभागाने निर्गमित केले आहे. शिक्षक समितीच्या म्हणण्यानुसार, अशा शाळा प्रामुख्याने वाडी-वस्ती, तांडे, पाडे अशा दुर्गम भागांत कार्यरत आहेत. जंगलव्याप्त भाग, ओढे-नद्या ओलांडून जावे लागणाऱ्या या भागांत आदिवासी, कष्टकरी वंचितांच्या बालकांसाठी गावातच शिक्षणाची व्यवस्था कायम ठेवणे आवश्यक आहे. शाळा बंद झाल्यास या बालकांचे, विशेषतः मुलींचे, शिक्षण थांबणार असून, ते शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर फेकले जाण्याची भीती आहे.

**वाहतूक व्यवस्थेचा उपाय अमान्य**

शाळा बंद करून विद्यार्थ्यांसाठी वाहतूक व्यवस्था करण्याचा उपाय शिक्षक समितीला अमान्य आहे. आजच्या परिस्थितीत मुलींच्या सुरक्षिततेचा विचार कुठेच होत नाही, त्यामुळे दुर्गम भागांतून वाहतुकीने दुसऱ्या गावी जाणे धोकादायक ठरू शकते, असे समितीचे म्हणणे आहे.

**उच्च न्यायालयातील प्रतिज्ञापत्राचे काय?**

शासनाकडून कोणतीही शाळा बंद केली जाणार नाही, असे प्रतिज्ञापत्र (शपथपत्र) यापूर्वी उच्च न्यायालयात सादर करण्यात आल्याचे ऐकिवात आहे. जर हे खरे असेल, तर त्या शपथपत्राचे उल्लंघन हा कमी पटसंख्येच्या नावाखाली शाळा बंद करण्याचा ‘जालीम उपाय’ आहे, असा प्रश्न शिक्षक समितीने उपस्थित केला आहे. बालकांच्या शैक्षणिक हिताची आणि सुरक्षिततेची तडजोड करून हा निर्णय घेण्यात आला आहे, असे समितीचे म्हणणे आहे.

### शिक्षणमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे आणि राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे, शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांच्यासह शिक्षण सचिव रणजितसिंग देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंग आणि अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांना यासंदर्भात निवेदन दिले आहे, अशी माहिती शिक्षक समितीचे राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेश सावरकर यांनी दिली आहे.

# एमपीएससीतून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत नियुक्ती

## नौशाद अत्तार ने जिद्द व चिकाटीच्या बळावर मिळविली नोकरी



बीड । दिव्य न्युज

नौशाद जब्बार अत्तार या गुणी विद्यार्थ्याने जिद्द, मेहनत व चिकाटीने एमपीएससी ची परीक्षा देऊन त्यात गुणवत्तेच्या बळावर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) बीड येथे लिपिक पदावर नियुक्ती मिळविली. या यशाबद्दल ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी त्यांचा पुष्पगुच्छ व शालसह पेढे भरवून हृदयी सत्कार केला. या छोटे खानी सत्कार कार्यक्रमात त्यांचे भाऊ वृत्तपत्र क्षेत्रातील संगणक तज्ञ इर्शाद अत्तार, शेख लईख़, जलील शेख, कांडेकर, बाळू, किशोर जोगदंड आदींची प्रमुख उपस्थिती होती. नौशाद अत्तार यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत एमपीएससीची परीक्षा दिली आणि त्यात उत्तीर्ण होऊन त्यांनी स्वबळावर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत लिपिक पदावर नियुक्ती मिळविली. त्यांच्या या यशाबद्दल उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# लाईफ हेल्थ क्लब, लाईफ स्टाईल जिमचे खेळांडूचा सत्कार



बीड । दिव्य न्युज

बीड येथील आर्म स्पोर्टस असोसिएशन , लाईफ हेल्थ क्लब , लाईफ स्टाईल जिम,वेट लिफ्टिंग अकॅडमी महात्मा फुले शॉपिंग सेंटर नवी भाजी मंडई बीड च्या खेळाडूंचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर ( औरंगाबाद ) व एस.डी. महाविद्यालय सोयगाव जिल्हा छत्रपती संभाजी नगर यांचे संयुक्त विदमाने संपन्न झालेल्या अंतर महाविध्यालयीन वेटलिफ्टिंग स्पर्धेत शेख शयान अहमद ( रौप्य पदक ), घेणे सुदर्शन बालाजी ( रौप्य पदक) व प्रवण विक्रम जाधव (कांस्य पदक ) मिळवले. या यशाबद्दल खेळाडूंचे व प्रशिक्षक शेख वसीम यांचे बॉडी बिल्डिंग, वेट लिफ्टिंग असोसिएशनच्या वतीने व बीड जिल्हा पॉवर लिफ्टिंग असोसिएशन चे सचिव सय्यद अमानउल्लाह अरशियानउल्लाह, मुकर्मजान पठाण ,शमशीर खान सर, सोनवणे फुलचंद गोविंद गणेश गोळप शेख अमजद रेहान खान फैजान खान यानी सत्कार करून अभिनंदन केले.

# कालिकादेवी विद्यालयात श्री आबासाहेब सर्जेराव ढवळे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न

शिरूर कासार। दिव्य न्युज

आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचलित, कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिरूर (का.)ता. शिरूर (का.)जि.बीड येथे विज्ञान विषयाचे शिक्षक श्री आबासाहेब सर्जेराव ढवळे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा,मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य केशव भांगे साहेब, नगरसेवक तथा माजी प्राचार्य व्ही.जी.काटे,माजी सभापती बबनदादा चौधरी,प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे,माजी प्राचार्य सुधाकर खोले,मा.शामराव हूले या मान्यवरांनी स्व.केशरबाई (काकू) क्षीरसागर व स्व. सोनाजीराव (नाना) क्षीरसागर यांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. त्यानंतर सत्कारमूर्ती श्री आबासाहेब सर्जेराव ढवळे व सौ. नूतन आबासाहेब ढवळे यांचा सपत्नीक, कपड्यांचा आहेर,शाल,श्रीफळ,व पुष्पहार देऊन भव्य सत्कार करण्यात आला.विद्यालयाचे प्राचार्य केशव भांगे साहेब यांनी आपल्या भाषणातून सांगितले की,श्री




आबासाहेब ढवळे सर हे एक प्रामाणिक, विज्ञानवादी आणि एक नवोउपक्रमशील शिक्षक आहेत. त्यांनी एकूण ३४ वर्षे, दोन महिने, शिक्षक म्हणून सेवा दिली आहे. त्यांनी अतिशय प्रामाणिकपणाने अध्यापनाचे कार्य पार पाडले.विज्ञानासारखा ऋक्ष विषय कलेच्या माध्यमातून मुलांना सखोलपणे शिकविला.ते एक जातिवंत तथा हाडाचे शिक्षक असल्यामुळे सर्व विद्यार्थ्यांचे आवडते झाले होते. विशेष म्हणजे त्यांनी कालिकादेवी विद्यालयाला विज्ञान प्रदर्शन स्पर्धेत राज्यस्तरीय पातळीवर नेले.त्यासाठी श्रीआबासाहेब ढवळे सरांचे मनापासून कौतुक; तसेच त्यांना सेवापूर्तीच्या आणि पुढील आयुष्याच्या हार्दिक शुभेच्छा देऊन मनःपूर्वक गौरव केला.यावेळी नगरसेवक वसंतराव काटे माजी प्राचार्य सुधाकर खोले प्राचार्य डॉ. विश्वास कंधारे,ज्येष्ठ बंधू मा. सोपानराव ढवळे, अंबादास बडे ह.भ.प.बाबा महाराज बडे, प्रा. महारुद्र डोंगरे विद्यार्थी प्रतिनिधी चि.शोयब आतार इत्यादींनी मनोगते व्यक्त केली.त्यानंतर सत्कारमूर्ती श्री आबासाहेब ढवळे सरांनी सत्काराला उत्तर देतांना सांगितले की, माझ्या आयुष्यात शिक्षक अतिशय इमाण- इतबारे सेवा केली. एकूण ३४ वर्षाच्या कार्यकाळातील अनेक आठवणींना उजाळा दिला.व आपल्या यशस्वी जीवनाचे रहस्य उलगडून दाखविले. यावेळी उपप्राचार्य बसवेश्वर देशमाने,पर्यवेक्षक जनार्दन काळे,प्रा.संजय काकडे,प्रा.नामदेव तरकसे प्रा.महारुद्र डोंगरे,विद्यालयातील सर्व प्राध्यापक,शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आत्माराम झिंजुर्डे यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा.विनोद गलांडे यांनी केले.शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# ९ ऑक्टोबर पासून वीज कामगार ७२ तासाच्या संपावर

## राज्यातील वीज ग्राहक व जनतेच्या हितासाठी वीज कर्मचारी संपावर

बीड । दिव्य न्युज

महावितरण कंपनीच्या नफ्याच्या क्षेत्रामध्ये अदानी,टोरेंटो इत्यादी खाजगी भांडवलदाराने वीज वितरणाचे मागितलेले परवाने देण्यास विरोध, महावितरण कंपनीत पुनर्रचना,कामगार कपात,३२९ विद्युत उपकेंद्रे खाजगी ठेकेदारांना चालविण्यास देणे,महानिर्मिती कंपनीचे ४ जलविद्युत केंद्राचे खाजगीकरण करणे,महापारेषण कंपनी २०० कोटींचे प्रकल्प खाजगी कंपन्यांना देणे,पारेषण कंपनीस शेअर मार्केटमध्ये लिस्टिंग करणे,वीज कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू करणे, लाईन स्टॉप व इतर कर्मचाऱ्यांचे कामाचे आठ तास निश्चित करणे,रिक्त पदे मागासवर्गीयाच्या आरक्षणासह भरणे,कंत्राटी कामगारांना कायम करण्याचा धोरणात्मक निर्णय घेणे, पगारवाढ करारानंतर प्रलंबित असलेल्या तिन्ही वीज कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांच्या इतर प्रलंबित समस्या सोडवण्यासाठी कृती समितीने संपावर जाण्याचा निर्णय घेतलेला आहे.

महावितरण कंपनीत वाढलेली वीज ग्राहक संख्या लक्षात घेऊन वीज ग्राहकांना चांगली सेवा देण्याकरीता शाखा,उपविभाग व विभागीय कार्यालयाची निर्मिती करावी,महावितरण कंपनीने विकलेल्या प्रत्येक युनिट विजेचे पैसे मिळावे व महसुलात वाढ व्हावी,वीज ग्राहकांना स्वस्त वीज मिळावी,यासाठी हा संप करण्यात येत आहे. संपामध्ये कर्मचारी,अभियंते,अधिकारी व कंत्राटी कामगार यांच्या कोणत्याही आर्थिक मागण्या नाही. २०२१ मध्ये राज्यातील एकूण ग्राहकांची संख्या २ कोटी ८९ लाख होती,एकूण उपविभाग ६३८ होते.एकूण कर्मचाऱ्यांची संख्या ८१,६९६ होती तरीही महावितरणचे व्यवस्थापन कंपनीने तयार केलेल्या आकृतीबंधानुसार संघटनात्मक रचना निर्माण केली नाही. त्यामुळे कार्यरत कर्मचारी व अभियंते यांच्यावर कामाचा प्रचंड ताण वाढलेला आहे. त्याचा परिणाम वीज ग्राहक सेवेवर झालेला आहे.सन २०२५ पर्यंत वीज ग्राहकांच्या संख्येत ३ कोटी १७ वाढ झालेली आहे. मात्र वाढीव वीज ग्राहकांना सेवा देण्याकरता एकूण ६४८ उपविभाग आहेत.या विभागात कर्मचारी व अभियंते यांची मंजूर पदे ८१,९०० आहेत.बऱ्याच मंजूर पदावर कंत्राटी पद्धतीने कामगारांची भरती करून कामकाज चालविण्यात येत आहे. महाराष्ट्रात लाखो वीज ग्राहकांनी असलेले शाखा व उपविभाग मोठ्या संख्येने आहेत परंतु महावितरण व्यवस्थापनाने नवीन व्यवस्था उभारण्यासाठी काहीही केलेले नाही.कृती समितीची मागणी आहे की,वाढलेल्या विविध ग्राहकांना योग्य, तत्पर






व कार्यक्षम सेवा देण्याकरीता,व्यवस्थापनाने प्रथम शाखा,उपविभाग कार्यालयाची निर्मिती करावी. कर्मचाऱ्याचे कामाचे आठ तास निश्चित करावे. सुधारित कामाच्या नियमांनुसार आवश्यक कर्मचारी भरावेत,नंतर देखभाल व बिलिंग कामाचे उपविभाग निर्माण करावे.नूतनीकरण करण्यापूर्वी तांत्रिक, अतांत्रिक कामगार व अभियंत्यांची सर्व २२ हजार रिक्त पदे मागासवर्गीयाच्या आरक्षणासह भरावीत. कंत्राटी कामगारांना सामावून घेण्याकरीता धोरणात्मक निर्णय घ्यावा,पगारवाढ करारानंतर प्रलंबित असलेल्या मागण्यावर प्रशासन चर्चा करत नसल्यामुळे व एकतर्फी महावितरण कंपनीत पुनर्रचनेची अंमलबजावणी करण्यात आल्यामुळे कामगार,अभियंते,अधिकारी यांच्यामध्ये प्रचंड असंतोष निर्माण झालेला आहे. दि.६ ऑक्टोंबर रोजी मा.अप्पर मुख्य सचिव ऊर्जा व मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक महावितरण कंपनी यांच्याबरोबर चर्चा झाली.

# महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेल्या कफ सिरपचा बीडमध्ये मोठा साठा

## ५०० बाटल्या जप्त, पुण्यातील एजन्सीकडून झाला पुरवठा

दिव्य वार्ता



### महाराष्ट्रात कोल्ड्रिप सिरपवर बंदी

मध्यप्रदेश आणि राजस्थान राज्यातील कफ सिरप औषधाच्या वापरामुळे बालकांच्या मृत्यू प्रकरणानंतर आता राज्य सरकारच्या अन्न औषध प्रशासन विभागाकडून खबरदारी घेतली जात आहे. राज्यात कोल्ड्रिप सिरपवर बंदी घालण्यात आली आहे. अन्न व औषध प्रशासनाकडून टोल फ्री नंबर सुरू करण्यात आला आहे. एप्रिल २०१७ ते मे २०२५ या कालावधीतील कोल्ड्रिप सिरप मेडिकलमध्ये असल्यास तात्काळ टोल फ्री क्रमांकावर माहिती देण्याच्या सूचना देण्यात आली आहे. महाराष्ट्राच्या एफडीएने रेस्पिफ्रेश टीआर आणि रीलाइफ कफ सिरप यामध्ये सुरक्षित मर्यादेपेक्षा अधिक विषारी डायएथिलीन ग्लायकॉल असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे विक्री, वितरण आणि वापरावर बंदी घालण्यात आली आहे. सर्व औषध परवानाधारकांना साठ्याची माहिती तात्काळ द्यावी, असे आदेश देण्यात आले आहेत.

### चवीसाठी वापर मात्र, किडनीवर परिणाम

डीईजी घटक हा कफसिरपमध्ये चव येण्यासाठीवापरला जातो. यामुळे औषधगोड लागते. मात्र ते अधिकवापरले गेल्याने त्याचेदुष्परिणाम होतात. मेंदूवर वकडिनीवर याचा परिणामहोतो. औषध पालकांनी मनानेदेऊ नये. औषध देण्यासाठीडॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असेबालरोग तज्ज्ञ डॉ.सचिनआंधळकर यांनी सांगितले.

### जिल्ह्यातील दोन एजन्सीला पुरवठा

रेस्पिफ्रेश टीआर हे कफसिरप गुजरातच्याअहमदाबाद येथील स्मार्टवेवेलनेस प्रायव्हेट लिमिटेडनावाच्या औषध निर्मितीकंपनीचे उत्पादन आहे. याकंपनीकडून हे थर्ड पार्टीविक्री होते. पुण्यातील एकाऔषध विक्री करणाऱ्यामोठ्या एजन्सीकडून बीडजिल्ह्यातील २ एजन्सीलायाचा पुरवठा झालेला होता.या दोन एजन्सीकडून बीडशहर, आष्टी, परळी वगेवराई येथील खासगीमेडिकलला याचा पुरवठाझाल्याचे तपासाणीत समोरआले आहे.

### औषधाची विक्री थांबवली, साठा परत मागवला

जिल्ह्यात रेस्पीफ्रेश टीआर कफ सिरपचा साठा असल्याची माहितीकळताच अन्न व औषध प्रशासनाने दखल घेतली. सहायक आयुक्तएम. जे. निमसे यांनी तपासणी मोहीम सुरु केली. आतापर्यंत १५६बाटल्यांची विक्री थांबवली गेली तर ५२ बाटल्या परत मागवल्या गेल्याआहेत. दरम्यान, डायथिलीन ग्लाइकॉल (डीईजी) हे रसायन आहे. याऔषधाचा कुठे कुठे पुरवठा झाला, याची तपासणी सुरु आहे.




### नमुने तपासणीला घेतले, अहवालानंतर डीईजी रसायनाचे प्रमाण कळेल

जिल्ह्यात रेस्पीफ्रेश टीआर या कफ सिरपचा साठा आढळला आहे. सुमारे ५०० बाटल्या आलेल्याआहेत. गेवराई येथून काही नमुने तपासणीसाठी घेतले आहेत. ज्या बॅचचे रिपोर्ट आधीच मध्यप्रदेश किंवाइतर ठिकाणी आले आहेत त्या बॅचऐवजी दुसऱ्या बॅचचे नमुने काढले आहेत. अहवाल आल्यानंतरत्यातील डीईजी रसायनाचे प्रमाण कळेल.

– एम. जे. निमसे, सहायक आयुक्त, औषध प्रशासन

### बीड शहर व तालुक्यात सर्वाधिक पुरवठा

बीड शहर व तालुक्यात १७७, गेवराई तालुक्यात १६६, परळी तालुक्यात७२ व आष्टी तालुक्यात १८ बाटल्यांचा पुरवठा झाला आहे. यातीलकाही बाटल्यांची विक्रीही झाली आहे. मात्र दोष सापडलेली बॅच वजिल्ह्यात असलेली बॅच ही वेगवेगळी आहे. अद्याप तरी जिल्ह्यातयामुळे कुणाला त्रास झाल्याची तक्रार अद्याप आलेली नाही.

बीड । दिव्य न्युज

महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेल्या 'रेस्पीफ्रेश टीआर' या कफ सिरपचा मोठा साठा बीड जिल्ह्यातून उघड झाला आहे. परळी, गेवराई, आष्टी आणि बीड शहर या ठिकाणांहून एकूण ५०० बाटल्या जप्त करण्यात आल्या आहेत. या कारवाईमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. ही सिरप यापूर्वी मध्य प्रदेशात २० हून अधिक लहान मुलांच्या मृत्यूला कारणीभूत ठरल्याचं समोर आलं होतं, त्यानंतर महाराष्ट्रातही या औषधावर बंदी घालण्यात आली होती. मात्र बंदीनंतरही या औषधाचा साठा जिल्ह्यात पोहोचल्याचं स्पष्ट झालं आहे. पुण्यातील एका एजन्सीकडून या सिरपचा पुरवठा करण्यात आला असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाकडून देण्यात आली. सध्या या सिरपचा साठा कोणत्या मेडिकलपर्यंत पोहोचला होता, याचा शोध घेण्याचं काम सुरू असून, सर्व साठा तातडीने मागवून नष्ट करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अन्न व औषध प्रशासन विभागाने या प्रकरणी कारवाई केली असून संबंधित औषध पुरवठादार आणि वितरकांविरुद्ध चौकशी सुरू आहे.

**तमिळनाडूमध्ये फॅक्टरीचा परवाना निलंबित**

तमिळनाडू सरकारच्या चौकशीत कांचीपुरम येथील श्रीसेन फार्मास्युटिकल या कंपनीबाबत मोठे खुलासे झाले आहेत. ४४ पानांच्या अहवालात ३२५ मोठ्या आणि ३९ गंभीर त्रुटी आढळल्या आहेत. कंपनीने गुड मॅन्युफॅक्चरिंग प्रॅक्टिसेसचे पालन केले नाही आणि नॉन-फार्मास्युटिकल दर्जाच्या प्रोपलीन ग्लायकॉलचा वापर करून सिरप तयार केला. या केमिकलमध्ये ४८.६ टक्के डायएथिलीन ग्लायकॉल आणि एथिलीन ग्लायकॉल आढळले, जे मानवासाठी अत्यंत विषारी ठरतात. औषध निर्मिती अत्यंत अस्वच्छ, कीटकयुक्त आणि गंधयुक्त वातावरणात होत असल्याचेही चौकशीत दिसून आले. त्यानंतर तमिळनाडू सरकारने फॅक्टरीचा परवाना तत्काळ प्रभावाने रद्द केला.

## ग्राउंड लेव्हलवर काम करणाऱ्या संगीताताई वाघमारे याच बीड नगराध्यक्षा पदासाठी पात्र उमेदवार



बीड । दिव्य न्युज

नुकतेच संपूर्ण महाराष्ट्रात नगरपरिषद निवडणुकीचे बिगुल वाजले. आणि, गेल्या ४० वर्षांपासून कधीही न घडलेला चमत्कार बीडमध्ये घडला. बीड नगर परिषदेच्या नगराध्यक्ष पदाचे आरक्षण अनुसूचित जाती महिला साठी राखीव झाले. आणि बीड शहरातील सर्व अनुसूचित जाती प्रवर्गातील राजकीय नेत्यांना नगराध्यक्ष पदाचे स्वप्न पडू लागले. परंतु, जागा महिलेसाठी आरक्षित असल्यामुळे सर्व राजकीय पक्षांना महिला उमेदवारच द्यावे लागणार आहेत. त्यामुळे सर्व राजकीय पक्षांमध्ये सक्षम अनुसूचित जाती प्रवर्गातील महिला उमेदवार शोधण्यासाठी धावाधाव करावे लागत आहे. अशातच डॉ. योगेशभैय्या क्षीरसागर यांच्या निकटवर्तीय असलेल्या संगीताताई वाघमारे यांच्या नावाची चर्चा शहरात जोर धरू लागली आहे.गेल्या वीस वर्षापासून सामाजिक तसेच राजकीय जीवनामध्ये कार्यरत असणाऱ्या, संगीताताई वाघमारे यांनी आपल्या सामाजिक आणि राजकीय जीवनाची सुरुवात आंबेडकरी चळवळीपासून केली. आंबेडकरी चळवळीचा वीस वर्षापेक्षा जास्त दांडगा अनुभव त्यांना आहे. तसेच ग्राउंड लेव्हलवर काम करत असल्यामुळे शहरात सर्वत्र त्या परिचित आहेत. प्रत्येकाच्या अडीअडचणीत-सुखदुःखात धावून जाणे, जनतेची कामे मन लावून करणे ,सर्वांशी आपुलकीने वागणे, सर्वधर्मसमभाव जपणे या गोष्टींमुळे त्या शहरात सर्वत्र परिचित आहेत. आणि, त्यांना मानणारा बीड शहरात मोठा वर्ग आहे. त्यामुळे येणाऱ्या बीड नगर परिषद निवडणुकीत नगराध्यक्ष पदाच्या त्या भक्कम उमेदवार ठरू शकतात.सध्या त्या डॉ. योगेशभैय्या क्षीरसागर आणि डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांच्या नेतृत्वात

►► पान २ वर

### जिंतूर तालुक्यासह संपूर्ण महाराष्ट्रात ओला दुष्काळ जाहीर करा

## जिंतूर तहसील कार्यालयावर आखिल भारतीय किसानसभा तालुका कमेटीच्या वतीने धरणे आंदोलन




जिंतूर । दिव्य न्युज :

सालेह चाऊस


जिंतुरच्या तहसील कार्यालय समोर दिनांक १० ऑक्टोबर शुक्रवारी अखील भारतीय किसानसभा जिंतुर तालुका कमेरीच्या वतीने एक दिवसीय धरणे आंदोलन करून राज्य सरकार ला इशारा देण्यात आला की, तालुक्यासह महाराष्ट्रातील सर्वच शेतकऱ्याची पीके उद्धवस्त झाली आहेत नदी नाल्यांना महापूर आल्यामुळे शेतकरी, शेतमजूरांची पीके,घरे, जनावरे, माणसे वाहुन गेली. अश्या परिस्थितत संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी, शेतमजूरांना पंजाब राज्य सरकारने ५०,००० रुपये एकरी मदत दिली त्याच प्रमाणे

►► पान २ वर

## RSS ने मुस्लिमांचं संरक्षण करावं, उर्दू वृत्तपत्राची भूमिका; मोहन भागवतांना काय दिला सल्ला?

मुंबई । दिव्य न्युज

बिहारमध्ये पुढील महिन्यात विधानसभा निवडणुकीचा रणसंग्राम पाहायला मिळणार आहे. या निवडणुकीच्या निकालाचा राष्ट्रीय राजकारणाच्या समीकरणांवर परिणाम होण्याची शक्यता असल्याने सर्वांचेच लक्ष त्याकडे लागून आहे. या सर्व राजकीय घडामोडींमध्ये देशातील काही उर्दू वृत्तपत्रांनी दोन वेगवेगळ्या मुद्द्यांकडे लक्ष वेधले आहे. मुंबईतील 'उर्दू टाइम्स' या दैनिकाने सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावरील हल्ल्याचा निषेध करणारा लेख छापला आहे, तर दिल्लीतील



'इन्कलाब' वृत्तपत्राने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला मुस्लिमांचे संरक्षण करण्याचा सल्ला दिला आहे. या दोन्ही वृत्तपत्रांमधील संपादकीय लेखात नेमकं काय म्हटलंय? त्याबाबत जाणून घेऊ

**उर्दू टाइम्सच्या लेखात सर्वोच्च न्यायालयातील घटनेचा निषेध**

मुंबईतील 'उर्दू टाइम्स' या वर्तमानपत्राने ७ ऑक्टोबरच्या आपल्या अग्रलेखात सर्वोच्च न्यायालयातील धक्कादायक घटनेचा तीव्र निषेध केला. न्यायपालिकेला कायद्याचे रक्षक आणि न्यायाचे मंदिर मानले जाते. अशा ठिकाणी घडलेल्या घटनेमुळे देशातील जनतेची मान शरमेने खाली गेली आहे. या कृत्यामुळे भारताची आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिमादेखील मलीन झाल्याचे उर्दू टाइम्सने

►► पान २ वर

## बीड नगर परिषद निवडणूक: युवा नेते सोहेल रफिक शेख वॉर्ड क्र.११ मधून उमेदवारीसाठी सज्ज

बीड । दिव्य न्युज

नगर परिषदेच्या आगामी निवडणुकीत वॉर्ड क्रमांक ११ मधून एका युवा आणि उत्साही चेहऱ्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. सामाजिक आणि स्थानिक प्रश्नांवर नेहमीच सक्रिय असणारे सोहेल रफिक शेख हे नगरसेवकपदाची उमेदवारी लढवण्याच्या तयारीत असल्याची विश्वसनीय माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

सोहेल शेख हे वॉर्ड क्रमांक ११ मधील रहिवासी आहेत आणि त्यांना परिसरातील मूलभूत समस्यांची चांगली जाण आहे. स्थानिक पातळीवरील पाणी, रस्ते, स्वच्छता आणि युवकांच्या रोजगाराचे प्रश्न घेऊन ते मैदानात उतरण्यास सज्ज झाले आहेत. त्यांच्या उमेदवारीमुळे वॉर्डातील नागरिकांमध्ये एक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. सोहेल शेख यांनी सांगितले की, बीड नगर परिषदेत युवाशक्तीला संधी मिळणे आवश्यक आहे. केवळ निवडणुकीसाठी नाही, तर वॉर्डाचा सर्वांगीण विकास हेच माझे एकमेव उद्दिष्ट आहे. वॉर्ड ११ मधील प्रत्येक नागरिकाच्या समस्या सोडवण्यासाठी मी कटीबद्ध राहील असे म्हटले. तसेच त्यांनी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वॉर्डातील विविध गट, तरुण मंडळे आणि ज्येष्ठ नागरिकांशी भेटीगाठी सुरू केल्या आहेत. तरुणांचा त्यांना मोठा पाठिंबा मिळत असून, वॉर्डातील अनुभवी आणि जाणकार लोकांचे मार्गदर्शन घेऊन ते

►► पान २ वर



## समस्यांवर भावी नेत्यांचे मौन, जनता लक्षात ठेवीन आता कोण..?

## तालुक्यातील भावी नेत्यांना अधिकाऱ्यांकडे 'नो-व्हॅल्यू'

श्रीगोंदा । दिव्य न्युज : गायत्री ढवळे

जनतेला राजकारणात गुंतवून आपले हित साधण्यात पटाईत असणाऱ्या भावी नेत्यांनी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून लोकसंपर्क ठेवला आहे. समस्या नेत्यांना दिसत असल्या तरी जाणीवपुर्वक डोळेझाक सुरु आहे, हे सगळ्यांना समजते. मा .नगराध्यक्ष भावी नगरअध्यक्ष सगळेच समस्यांपासून दूर आहेत. सर्व सामान्याच्या प्रश्नांवर या नेत्यांचे मौन असल्याने लोक बेचैन आहेत.

श्रीगोंद्यातील अनेक नेत्यांना नगराध्यक्ष, नगरसेवक होण्याची घाई झाली आहे. निवडणुकीत पैसा खर्च केला की जिंकलोच, ही भावना नेत्यांची झाली आहे. सगळेच पक्ष व नेते आता पैशाच्या जीवावर निवडणुका करायला निघाल्याने लोकांकडे सध्या कुणाचेही लक्ष नाही. आलेल्या निधीची विल्हेवाट कशी लागते, हे पाहणे लोकांचे काम नाही. प्रशासन त्यासाठी जबाबदार असते. पण सत्ताधारी व विरोधी नेत्यांचा त्यासाठी अभ्यास व वचक लागतो, तो सध्या तरी नाही. कामांबाबत ठराविक कार्यकर्ते व नेत्यांचे स्विय सहायक यंत्रणा हाताळत असल्याचे वास्तव नाकारता येत नाही.

तालुक्यातील रस्त्यांची अवस्था वाईट आहे. अनेक रस्त्यांचे खड्डेही भरलेले नाहीत. खड्डे बुजविण्याचे कंत्राट घेणारे ठेकेदार काम करीत नाहीत. अनेक रस्त्यांवर नव्याने निधी पडल्याने खड्डे बुजविण्याच्या टेंडरचे काय झाले हेही समजत नाही. गेल्या अनेक दिवसांपासून शहरात घंटागाडी वेळेवर येत नाही,पाणी वेळेवर सुटत नाही, लक्ष्मीनगर मधील भाजी मंडईच्या प्रश्नासाठी नागरिकांनी रस्त्यावर उतरून निवेदन दिले त्या वेळी नागरिकांची होणारी अडचण भावी नगराध्यक्ष, नगरसेवक यांना दिसली नाही. शहरात मध्ये वीजेची समस्या गंभीर आहे.

►► पान २ वर






हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२-२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२-२३१२२०